Vol 5 Issue 5 Nov 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

ज्ञानेश्वरांच्या विरहभावना प्रकट करणाऱ्या विराण्यांची वैशिष्ट्ये

एकनाथ सयाजी ढोणे
सहयोगी प्राध्यापक, रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

सारांश :

मराठी संतांनी मध्ययुगीन महाराष्ट्रा मध्ये भक्तिमार्गाची स्थापना करून एका नव्या युगाचा प्रारंभ केला. लोकजीवनाला नवे वळण लावण्याच्या हेतूने विविध धर्मपंथ या काळात उदयाला आले. उत्तर आणि पूर्व भारतामध्ये 'मधुराभक्ती' नावाचा संप्रदाय या काळात अतिशय लोकप्रिय होता. बंगालमध्ये चैतन्य प्रभूंच्या काळात ही प्रवृत्ती पूर्ण विकास पावली आणि साऱ्या उत्तर/पूर्व भारतात दोन-तीनशे वर्षेपर्यंत या भक्तिविचाराने अधिराज्य प्रस्थापित झाले.

1. प्रस्तावना :

या भक्तिभावाचा एक आविष्कार विराण्यांमधून प्रकट झाला. 'विराण्या' हे विराणीचे अनेक वचन. विराणी म्हणजे विरहात राहून परमात्म्याशी मिळू पाहणारी व्यक्ती. म्हणून तिला विरहिणी किंवा विराणी म्हणतात. मराठी संतांनी विरहाच्या व मीलनाच्या अनेक आंर्तगर्भ विराण्या लिहिल्या. जीव परमात्म्याच्या भेटीसाठी किती व्याकुळ होतो. त्याच्या मनाची तडफड कशी होते. त्याच्या जीवाची लाही लाही कशी होते याचे मोठे सुंदर वर्णन विराण्यांतून होते.

हा विरह शेवटी मीलनाजवळ संपतो. तो जीवाचा सखा भेटतो आणि मीलनाचा आनंद चारी बाजूंनी उसळून येतो. जीवाशिवातील विरहाचा, आतुरतेचा, मानसिक कष्टाचा, मीलनाच्या सुखाचा आणि पुत्रसुखोपभोगासाठी विरहाचा आनंद मराठी संतांनी अनुभवला आहे.

भक्त आणि परमेश्वर यांच्या विरहातील उत्कटता आणि मीलनाची बेहोषी प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी या नात्याच्या रूपाने व्यक्त करणारे गीत म्हणजे विराणी. त्यामागील तात्त्विक भूमिका व इतिहास आता थोडक्यात पाहू.

2. कांताभाव :–

परमेश्वरावर 'आत्यंतिक प्रेम' म्हणजे भक्ती. परंतु आत्यंतिक प्रेम हे भक्तीचे अविभाज्य अंगच मानावयास हवे. 'मधुराभक्ती'तील भक्तीच्या उत्कटतेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी नारदांनी गोपींच्या प्रेमाचा दृष्टांत दिला आहे. 'यथा व्रजागोपिकानाम्' या सूत्रात ते गोपींच्या उत्कट कृष्णप्रेमाचा उल्लेख करतात. गोपींचे कृष्णविषयक प्रेम अत्यंत उत्कट होतेच, पण शिवाय ते सर्वस्वार्पण बुध्दीने केलेले प्रेम होते. गोपी या संसारी स्त्रिया. पण घरदार, पति-पुत्र, सासू-सासरे या सर्वांची आसक्ती सोडून त्या कृष्णावर अनुरक्त झाल्या होत्या. यापासून त्यांना परावृत्त करावे म्हणून कृष्णाने त्यांना उपदेश केला. परंतु गोपींच्या मनावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. उलट कृष्णाने आपली निराशा केली. त्यामुळे त्या अत्यंत कष्टी झाल्या. "सर्व विषयांचा त्याग करून आम्ही तुझ्या पायाशी आलो आहोत, अशाप्रकारे आमचा अव्हेर करणे हे भगवंता, योग्य नाही." असे त्या कळवळून सांगू लागल्या.

गोपिकांच्या शृंगारभक्तीत मधुराभक्तीचा अंश आहे. परंतु शृंगारभक्तीच्या कल्पनेत मधुराभक्तीची कल्पना पूर्णपणे व्यक्त होऊ शकत नाही. मधुराभक्ती ही एका विशिष्ट तात्त्विक सिध्दान्तावर आधारलेली आहे. गोपींच्या ऐवजी पुरुषभक्त असतील तर त्यांनी कृष्णावर शृंगारिक प्रेम कसे करायचे?

भक्त स्त्री असो अगर पुरुष असो. परमेश्वराविषयी कांताभाव धारण परमात्म्याची प्रेयशी अथवा पत्नी होणे ही मधुरासक्ती होय. भारतीय मधुराभक्तीचे आद्य आणि प्रमुख केंद्र म्हणजे पूर्व भारत हे होय. येथे प्रथम ही स्त्रीप्रधान उपासना उदयाला आली आणि नंतर वैष्णव भक्तांच्या बरोबर वृंदावन व अन्य प्रदेशात गेली.

महाराष्ट्रात मात्र माधुर्यरतीला स्थान मिळाले नाही. सख्य, दास्य, वात्सल्य आणि शांत या भक्ती प्रकारातच महाराष्ट्र

रमला. याचे एक कारण असे दिसते की, बंगाल अगर उत्तर भारतात ज्याप्रमाणे वामाचारप्रधान तंत्राने कामाचाराची पूर्वपिठिका तयार करून ठेविली होती तशी महाराष्ट्रात नव्हती. आणि शिवाय ज्ञानेश्वरांच्या नवयुग प्रर्वतनाचे वैशिष्ट्याच असे होते की, अनैतिकतेला असामाजिकतेला आणि स्वतंत्र कर्मकांडात्मक भक्तिसाधनेला येथे अवसरच मिळाला नाही.

3.ज्ञानवैराग्याची बैठक :–

महाराष्ट्रातील मधुराभक्ती भागवत संप्रदायाच्याच आधाराने विकसित होत गेल्यामुळे तिला गौरवपूर्ण अशी मर्यादा प्राप्त झाली आहे. बहुतेक संतांनी विठोबास माऊली म्हणून आळविले आहे. या माऊलीशी 'शृंगारी' भाव कल्पिताना संतांनी कमालीचे गांभीर्य व मर्यादा राखली आहे. ज्ञानदेव, तुकाराम यांच्या विरहिण्या या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. भाषेत सर्वत्र शृंगारी थाट पण अभंगातील अनुभूती मात्र वैराग्याची वा ज्ञानाची दिसून येते. भक्ती व ज्ञान यांचे अपूर्व मिश्रण येथे दिसते. स्वतःच्या भक्तिसाधनेत वा अनुभूतीच्या प्रकटीकरणात मराठी संतांनी राधेला फारसा वाव दिला नाही. नामदेव-एकनाथांनी वस्तुनिष्ठ दृष्टीने राधा-कृष्णाच्या क्रीडा वर्णन केल्या आहेत हे खरे. पण पुराणांच्या आधारे शृंगारी लोकांना भक्तिमार्गाकडे ओढण्यास हा राधाविलास व गोपीक्रीडा आहे, असा निर्वाळा जागजागी संतांनी दिला आहे. तरी नामदेव, एकनाथ स्वतंत्रपणे विरहिण्यांतून ज्यावेळी आत्मिक अनुभव सांगतात, त्यावेळी शृंगारभक्तीची उदात्तता कायम राहिली आहे. राधा-भाव अंगी बाणवून तसे आचरण नित्याच्या व्यवहारात करण्याची संतांना आवश्यकता वाटली आणि याचाच सामाजिकदृष्ट्याा महत्त्वाचा परिणाम असा झाला की, लोकांपुढील नैतिक आदर्श कधी ढळला नाही. सारे संत वैराग्याचे पुतळे होते. काहींनी प्रपंचातील माधुरी कोणत्या भूमिकेवरून घ्यावी हेही दर्शविले. पण संतांच्या संप्रदायात भक्तीच्या नावाखाली अनाचारास व सामाजिक पतनास कोठे वावच उरला नाही. विरहिण्यांतून ज्ञानवैराग्याची प्रखर ज्योतच तेवत असल्याने तिच्या प्रकाशात नैतिकतेचा महान आदर्श आपल्या स्थानापासून ढळू शकला नाही.

परमेश्वराची भेट होण्यासाठी भक्त काकुळतीला येऊन त्याची विनवणी करीत असतो. त्याची व्याकुळता शब्दाशब्दांतून आपल्या मनाला जाणवते. कधी हा भक्त शुभशकुन दे, आनंदाची बातमी आण असे कावळ्याला विनवून सांगतो, तर कधी तुकारामांसारखा संत 'वाळो जन मज म्हणोत शिंदळी' असा मनोनिर्धार करून संसाराचा त्याग करतो. त्या 'बळियाच्या बळिवंता' होण्याचा ध्यास घेतो. 'जलविण मासा जैसा तळमळी' अशी बहिणाबाईंची अवस्था होते तर त्या काळ्याा कृष्णाचा वेध लागलेले एकनाथ त्या कृष्णरंगात रंगून जातात. या 'आर्त' भक्तीची भाववृत्ती त्यांच्या शब्दांतून व्यक्त होते. ते परमेश्वराचा धावा करतात, टाहो फोडतात, प्रेमळ ठपका देतात. व्याकुळ विनवण्या करतात. केव्हा तो पाशात अडकलेल्या पाडसासारखा तडफडतो, तर कधी चातकाची, मोराची भूमिका घेतो. अनेक वेळा तो कृष्णविरहिणी गोपी होतो आणि विरहीजनांचे दुःख अनुभवतो. अशा प्रकारच्या अनेक भूमिकांपैकी प्रेयसी-प्रियकराच्या नात्यातील विराण्या अधिक प्रसिध्द पावलेल्या दिसतात. याचे कारण 'मधुराभक्ती' या संप्रदायाचा प्रभाव हे होय.

वैष्णव संप्रदायी भक्तीने महाराष्ट्रात जरी मूळचे अतिशय सोज्वळ भागवतपंथी रूप टिकवून धरले होते, तरीही राधारतीची व विरहाची रूपके या काव्यातून आली आहेतच. राधाकृष्ण रतीने वियोगयुक्त शृंगाराचे वर्णन जसे काव्यात आणले तसेच मुग्ध आणि उत्तान शृंगाराचेही आणले. परंतु भक्तकवी हा 'त्या' तऱ्हेच्या बेहोशीत रंगलेला क्वचित आढळला तरी त्याचा भक्तिभाव हा तेथही झाकळलेला नसतो. त्याच्या मनातील भक्तीची आतुरता, व्याकुळता ही प्रेयसीच्या प्रतिमेतून रूपकभावाने प्रकट होते व ती आकुळ-व्याकुळ भावना जिवंत व ज्वलंत असल्यामुळे कोठल्याही प्रतिमेतून, प्रतीकातून, संकेतातून वा रूपकातून तेवढ्याच प्रभावीपणे व्यक्त झाल्यावाचून राहात नाही. मुमुक्षू जीवांच्या आंतरिक वेदना या काव्यातून उत्कटपणे व्यक्त होतात.

'विराण्या' या साहित्यप्रकाराचे स्वरूप आणि मराठीतील त्यांचा आविष्कार हा असा आहे.

4.श्री ज्ञानेश्वरांच्या विराण्या :–

ज्ञानेश्वरांच्या विराण्या हे मराठी भाषेचे एक अनमोल लेणे आहे. साक्षात्काराच्या अनुभूतीचा जिवंत झरा त्यात झुळझुळू वाहताना दिसतो. अभंगातून स्फुट भावना व विचार यांना प्राधान्य असल्यामुळे तरल, सूक्ष्म व गूढरम्य अनुभवांच्या प्रकटीकरणास मराठी भाषेत अभंग हे माध्यम फार सोयीचे ठरले आहे. 'घनु वाजे घुणघुणा। वारा वाहे रुणझुणा' किंवा 'पंढरपूरचा निळा, लावण्याचा पुतळा' किंवा 'पैल तो गे काऊ कोकताहे' यासारखे अभंग शतकानुशतके जनमाणसात आपले स्थान मिळवून आहेत. ज्ञानेश्वरांची काव्यदृष्टी, कोमलता व भक्तीचे माधुर्य यांचा उत्कट मिलाफ ज्ञानेश्वरांच्या विराण्यात आढळतो. परमेश्वराच्या भेटीची ओढ, परमेश्वराचे आणि त्यांचे अंतरीच्या जिव्हाळ्याचे नाते ज्ञानेश्वर अत्यंत तरल, हळुवार आणि आल्हाददायक प्रतिमांमधून व्यक्त करतात.

भक्तीशास्त्रात विरहाला फार महत्त्व दिले जाते. प्रत्यक्ष भेटीपेक्षा वाट पाहण्यास विशेष आनंद असतो. कारण या प्रतीक्षाकालात ज्याच्यावर प्रेम करायचे त्याचे गुणगाण, त्याच्यावरचा राग, त्याच्याशी केलेला प्रेमकलह, त्याचे सुंदर रूप, त्याच्या रमणीय क्रीडा इ. चे सतत चिंतन होत असते. या मनोभूमिकेतूनच मराठी संतांच्या विराण्या शब्दबध्द झाल्या आहेत. ज्ञानेश्वरांच्या विराण्यांचा विचार करतानाही आपण त्यांचे भावविष्काराच्या आधाराने दोन स्वतंत्र गट करू शकतो. परमेश्वराच्या भेटीसाठी उत्सुक असलेली विरहिणी आणि परमेश्वराच्या भेटीनंतर सुखनिधान लाभल्यामुळे आत्मानंदात मग्न असलेली विरहिणी; या विरहिर्णीची मनोवस्था नेमकेपणाने व्यक्त करण्यात ज्ञानेश्वरांचे काव्यचातुर्य प्रकट होते. तसेच त्या परमसुंदर, घननीळ कृष्णाचे वर्णन करण्यात त्यांची प्रतिभा रंगून जाते, कमालीची सुखावते.

5.विरही भावना प्रकट करणाऱ्या विरहिणी :–

ज्ञानेश्वरांची विरहिणी श्रीकृष्णाच्या निळ्याा रंगावर भाळली आहे. श्रीकृष्णाची अत्यंत उत्कट ओढ तिच्या मनात दाटली

आहे. तशी ती प्रकृतीने नाजूक पण स्वभावाने कणखर आहे. 'घनु वाजे घुणघुणा'

या विरहिणीतील तिच्या मनाची तगमग बघण्यासारखी आहे.परमेश्वराशिवाय तिच्या अंगाचा इतका दाह होतो आहे की, चंद्र, चांदणे, चाफा किंवा चंदन या कोणत्याच गोष्टी तिच्या शरीराला / मनाला आल्हाद, आराम देऊ शकत नाहीत. फुलांची कोमल शेज, ती सुखशय्या ही तिला आगीसारखी भासते आहे. कोकिळेचे मधुर स्वर तिला ऐकावेसेही वाटत नाहीत. आरशात बघितले तर तिला स्वतःचे रूप दिसत नाही. आरशातही तिला त्या सावळ्याा शामसुंदर कृष्णाचेच रूप दिसते. पंढरीरायाच्या भेटीशिवाय आपला प्राण वाचणार नाही, असे तिला वाटते. या कृष्णाच्या भेटीसाठी ती वाट्टेल ते सहन करण्यात तयार आहे. ती म्हणते...

"त्या सावळ्याच्या प्राप्तीसाठी मी पाच दमड्यांचे जाडेभरडे वस्त्र नेसेन. त्याचे उष्टे-माष्टे अन्न ग्रहण करून मी जगेन. त्याच्या दासीची मी दासी होईन आणि कशाचीही अपेक्षा न करता मी त्याच्या घरी सगळे कष्ट सहन करीन. त्याच्या घरचा उंबरा उशाला घेऊन मी झोपेन आणि माझ्या अंगावरून येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या येरझारा आनंदाने सहन करीन. त्याच्या प्राप्तीसाठी हा सर्व त्रास मी आनंदाने सहन करीन."

विरहिणीची एवढी तगमग, एवढी उत्कटता बघून त्या परम कृपाळू सावळ्याा कृष्णाचे मनही पाझरतेच; तोही तिच्या भेटीसाठी आतूर, उत्सुक होतो. त्याच्या येण्याच्या खुणा तिला आजूबाजूच्या वस्तुमात्रांतून निसर्गातून पटतात आणि ती आनंदाने म्हणते -

"पैल तो गे काऊ कोकताहे
शकुन गे माये सांगताहे ।"

मग आपल्या प्रियकराच्या आगमनाची वार्ता सांगणाऱ्या कावळ्याचे किती कौतुक करू अन किती नको असे तिला होऊन जाते. ती त्याचे पाय सोन्याचे मढवून काढायला तयार होते. त्याच्यासाठी दहीभात, दुधाची वाटी, रसाळ आंबे हे सर्व काही द्यायला ती तयार आहे, कारण त्याने तिच्यासाठी अतिशय तिच्या या आनंदाचे कारणही तसेच आहे. कारण या परमात्म्याच्या प्राप्तीसाठी तिने संसाराचा त्याग केला आहे. आणि तोच दुरावल्यामुळे त्याच्या विरहाच्या दुःखाने ती वेडीपिशी झाली आहे. पौर्णिमेचे चांदणे क्षणाक्षणाला कमी होते तसे तिचे जीवन त्याच्याशिवाय कणकणाने कमी होते आहे. अत्यंत वेचक-वेधक शब्दांत ज्ञानेश्वर विरहिणीच्या या विरहोत्कट अवस्थेचे चित्रण करतात. श्री ज्ञानेश्वरांच्या विरहाची उत्कटता अशा अनेक रूपांनी प्रकट झालेली आहे.

6.विराण्यातील सौंदर्य :-

मराठी संतांनी आपणास आलेले अनुभव अभंगांच्या माध्यमातून अतिशय प्रभावीपणे व्यक्त केलेले आहेत. पंढरी, विठ्ठल, संतमहिमा, नामस्मरण इत्यादी विषयांवर मराठी संतांचे लेखन आजही समाजमनावर आपला ठसा उमटवीत आहे. मराठी संतांचे मुख्य दैवत पंढरीचा पांडुरंग. पंढरीचा हा काळा विठू त्यांचा पिता, माता, बंधू, सखा, धाता, पितामह इत्यादी विविध नात्यांनी त्यांच्या जीवनात सामावला आहे. पंढरीच्या विठूशी विठाबाई नाते जोडून वात्सल्यभावाचे हृदयंगम दर्शन संतांनी आपल्या अभंगातून घडविले आहे. आईवर रागावणे, रुसणे, तिच्यासाठी हट्ट धरणे, तिच्या मांडीवर बागडणे इत्यादी मार्गांनी ही संतमंडही हे वास्तल्यसुख भोगताना दिसतात.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर आणखी एक सुरम्य व भावगर्भ नाते मराठी संत मधून मधून व्यक्त करतात. ज्ञानेश्वरांनी बाराव्या अध्यायात मोठ्याा कौतुकाने अर्जुनाचे व आपले नाते व्यक्त करताना म्हटले आहे की,

अर्जुन तो भक्त। तोचि योगी तोचि मुक्त।
तो वल्लभ मी कांत। ऐसा पढिये।।१५६।।

परमेश्वर आणि भक्त यांच्यातील अतूट भावबंधाचे वर्णन करण्यासाठी, आध्यात्मिक अनुभव सांगण्यासाठी पती-पत्नीच्या मिलनाचे, विरहावस्थेचे वर्णन साधुसंतांनी केलेले दिसते. ज्ञानेश्वरही याला अपवाद नाहीत. ज्ञानेश्वरांच्या दिव्य प्रतिभास्पर्शाने उलट या अभंगांना, या नात्याला एक वेगळीच मधुरता प्राप्त करून दिली.

1) ज्ञानदेवांच्या विरहिणी :-

कृष्णाची व विठ्ठलाची भक्ती या प्रकारच्या (गौळणी-विराण्या) अभंग वाङ्मयात ज्ञानदेवांनी वर्णिली आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव यांतून त्यांनी तत्त्वज्ञान सांगितले तर स्फुट अभंगांतून आत्मानुभव सांगितला, "ज्या मुखातून ज्ञानेश्वरी प्रकट झाली. त्याच मुखातून हे अभंगही प्रकट झाले... तेच व्यापक ज्ञान, तोच भगवद्भक्तीचा जिव्हाळा, तेच स्वात्मसुखाचे उद्गार, दोन्हीकडे एकच दृश्य, एकच भाषापध्दती, एकच कवित्व!" (ल. रा. पांगारकर : मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १, पृ. ६०१)

या गौळणी-विरहिणीतून ज्ञानेश्वरांनी कृष्णभक्ती विस्ताराने गायिली आहे. श्रीकृष्णाचे बालरूप, त्याच्या लहानपणीच्या लीला, गोपींचे त्याच्यावरील विशुध्द प्रेम, यशोदामातेजवळची गोपींनी केलेली गाऱ्हाणी, गोपींची विरहावस्था, त्यांच्या मनाची तगमग, श्रीकृष्णदर्शनाची त्यांची उत्कंठा, त्यांच्या मीलनात त्यांना होणारा अद्वितीय आनंद इत्यादी सर्व गोष्टी ज्ञानेश्वरांनी मोठ्याा बहारीने वर्णन केल्या आहेत. तितक्याच उत्कटपणे विरहिणीचे वियोगदुःख, रात्रीचे झालेले जागरण, सर्वांगाची होणारी आग, विरहातून उत्पन्न होणारे कारुण्य यांचे वर्णन केले आहे.

2) ईश्वरप्राप्तीचे सुख वर्णन करणाऱ्या विराण्या :–

परमेश्वरप्राप्तीचे सुख हे नेहमीच अनिवार, दुसऱ्या कशाशीही तुलना नसलेले आणि भक्ताला परमेश्वर रूपातच सामावून घेणारे असते. एकदा परमेश्वराची प्रत्यक्ष भेट घडली की भक्तांचे वेगळे अस्तित्त्वच राहात नाही. तो त्या ब्रह्मानंदाशी एकरूप होऊन जातो.

ज्ञानेश्वरांच्या विरहिणी अशा भेटीसाठी तळमळणाऱ्या घरादाराची पर्वा न करता, त्या सावळ्याा कृष्णाच्या बासरीच्या आवाजाने नादावलेल्या अशा आहेत. त्यांना श्रीकृष्ण भेटतो तेव्हा त्यांच्या सुखाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांची प्रतिभा पालवते. आपल्याच रंगात रंगलेली ही विरहिणी श्रीकृष्णाच्या आलिंगनाने त्याच्या रंगात रंगून जाते. तिचे वेगळे अस्तित्त्वच राहात नाही. जिकडे बघावे तिकडे तिला तो घननीळ श्रीकृष्णचं दिसतो. आपण समर्थांच्या घरची पट्टराणी झालो याचा अभिमान तिच्या मनात दाटतो. पंढरपूरच्या त्या निळ्याा लावण्याच्या पुतळ्याच्या प्राप्तीमुळे तिला जीवनाचे सार्थक झाले असे वाटते.

ज्याच्यासाठी आपण घरदार, सगेसोयरे सोडले तो श्रीकृष्ण समोर उभा पाहून ती वेडावते. त्याच्या पायी मिठी घालण्यासाठी धावत जाते. त्याच्या सगुण रूपावर भाळलेली ती त्याला आलिंगन देण्यासाठी

तिचा जीव उतावळा होतो. त्याचे सतत चिंतन करून ती कृष्णमयच होऊन जाते.

आता मनात एकच शंका आहे. त्याला भेटल्यानंतर, जिवाशिवाची भेट झाल्यानंतर पुन्हा विरहाचे दुःख तर वाट्याला येणार नाही ना, या शंकेने त्या धास्तावतात. 'पारु रे पारु कान्हा झणे करिसी अव्हेरु' अशी त्या कृष्णाची लडीवाळ विनवणी करतात.
ज्ञानेश्वरांच्या विराण्यांमध्ये अशा श्रीकृष्णाच्या भेटीसाठी तळमळणाऱ्या त्याच्या आगमनाच्या सूचनेने मनोमन मोहरून जाणाऱ्या, त्याच्या भेटीत ब्रह्मानंदाचा अनुभव घेणाऱ्या, तरीही पुन्हा विरह तर वाट्याला येणार नाही ना अशा शंकेने धास्तावणाऱ्या आणि प्रत्यक्षात मात्र,

'विठ्ठल विठ्ठल झाला देह माझा'
असे परमेश्वररूप पावणाऱ्या अशा विविध प्रकारच्या विरहिणींचे चित्र आढळते.

3) ज्ञानेश्वरांची काव्यशैली :–

साध्या सरळ अभंगाच्या रचनेमधून ज्ञानेश्वर आपल्यासमोर एक फार देखणे शब्दचित्र साकार करतात. गोकुळ / वृंदावनाच्या त्या कावऱ्याबावऱ्या गवळणी, तो घनसावळा मुरलीधर, ते कोमल चांदणे, चंद्र, चंदन, चाफे आणि कोकिळेचे स्वर या सगळ्याा प्रतिमांनी या चित्राला नाद-रंग-गंध-स्पर्शाचे वैभव प्राप्त करून दिले आहे. त्यांची अर्थगर्भ शब्दयोजना चकीत करून टाकणारी आहे. आज ७०० वर्षानंतरही या विरहिणींच्या भावनांची उत्कटता तसूभरही कमी झालेली नाही. म्हणूनच 'ज्ञानेश्वरांची विराणी' मराठी भाषेत, मराठी वाङ्मयात आपल्या मोहक आकर्षणाने रसिकांना आजही आकर्षित करून घेते आहे.

ज्ञानेश्वर सर्व भक्तकवींचे मुकुटमणी आहेत. परंपरा जरी 'ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस' अशी असली तरी संवेदनक्षम रसिकतेने या काव्याचा आस्वाद घेताना, त्यांच्या काव्यातील सर्व संवेदक शक्तींना दिपविणारे वैभव अत्यंत तरल, सूचक ध्वनिसंकुल अशा आविष्कारात प्रकट होऊ लागते. याचे कारण ज्ञानदेवांच्या वाणीला आलेले व्यापक, सूक्ष्म, सूचक अर्थाचे सामर्थ्य, ज्ञानेश्वरांचे सर्व जीवनच अलौकिक भासण्यासारखे होते. तशीच त्यांची शब्दार्थशक्तीही सामान्याच्या पलीकडे गेलेली होती. आधुनिक मनालाही भुरळ घालणारी या भक्तिकाव्यातील शक्ती म्हणजे शब्दांच्या सामर्थ्याचा अत्यंत विस्मयकारक आविष्कार होय. तिची भावशीलता आणि चिंतनशीलता तर काळाच्या कसोटीवर उतरलेले अक्षरसत्यच आहे.

संदर्भ :–

०१.डॉ. पाटील शिवाजी, 'संत साहित्यातील गुरूरुप', रजत प्रकाशन, औरंगाबाद, मार्च २००३.
०२.नसिराबादकर ल. रा. 'ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
०३.पोतदार अनुराधा कृ., 'तुकाराम : कथात्म साहित्य : एक अभ्यास', प्रतिमा प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९९६.
०४.डॉ. काळे कल्याण, 'संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९२.
०५.बहिरट, भालेराव प. ज्ञा., 'वारकरी संप्रदाय उदय व विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे.
०६.डॉ. मोहिते शिवाजीराव, 'वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य', कर्मवीर प्रकाशन, पुणे.
०७.जोशी मधुकर रामदास, 'सिध्द परंपरा आणि महाराष्ट्रातील संत', विजय प्रकाशन, नागपूर.
०८.डॉ. गिंडे वा. पु., 'कल्लोळ अमृताचे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.
०९.कुलकर्णी व. दि., "ज्ञानेश्वरांचे काव्यशास्त्र", स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च १९९३.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org